# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६

## ठळक बातम्या

1. **भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि जबाबदार एआय, राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी ठेवलं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
2. **राज्यात निवडणूक याद्यांचा सुधारणा कार्यक्रम - S.I.R. (एसआयआर) एप्रिल मध्ये लागू होणार.**
3. **राज्य शिक्षण मंडळाच्या १० वीच्या परीक्षेला प्रारंभ, कॉपीसह इतर गैरप्रकार रोखण्याकरता विशेष व्यवस्था.**
4. **नागपूर इथल्या अंबाझरी तलावातील जलपर्णी निर्मूलनाची मोहीम युद्धपातळीवर राबवण्याचे महापौर निता ठाकरे यांचे निर्देश.**

## आता सविस्तर बातम्या .......

### एआय इम्पॅक्ट शिखर परिषद

ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी शेती केवळ आर्थिक क्षेत्र नाही, तर उपजीविका, सामाजिक स्थिरता आणि राष्ट्रीय सुरक्षा असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित भारत एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत आज 'एआय फॉर ॲग्रीकल्चर:स्केलिंग इंटेलिजन्स फॉर फूड ॲण्ड क्लायमेट रेजिलिअन्स,' या विषयावरच्या सत्रात ते संबोधित करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि जबाबदार एआय, राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी ठेवलं असल्याचं फडणवीस म्हणाले. अंदाजे ५० कोटी भारतीय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे एआयचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं आवश्यक असल्याचं त्यानी नमूद केलं. या सत्रानंतर वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले,

महाविस्तार ॲपला  शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, यामध्ये आणखीवाढ होईल अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले,

दरम्यान,भारत एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आरोग्य, सायबर सुरक्षा, अंतराळ अशा विविध क्षेत्रातील एआय आणि डीपटेक स्टार्टअप्सच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

**पॅक्स सिलिका**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार, पॅक्स सिलिका चं सदस्यत्व भारताने स्वीकारलं आहे. नवी दिल्लीत आयोजित, एआय इम्पॅक्ट परिषदेत या करारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते. आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार याद्दष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे. या करारामुळे संगणकीय चिप्स सेमीकंडक्टर्स उद्योगात भारताला मोठा फायदा होणार असल्याचा विश्वास, अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला.

**मोदी संवाद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या सेवा तीर्थ इथं आरोग्य सेवा, सायबर सुरक्षा, अवकाश आणि इतर क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपटेक स्टार्ट अप्सच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. या बैठकीत पंतप्रधानांनी  शेती, पर्यावरण संरक्षण आणि मातृभाषेतून उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या शक्यतांवर चर्चा केली.

**‘जी राम जी’**

‘जीराम जी’ अर्थात विकसित, भारत रोजगार आणि उपजिविका,अभियान हमी ग्रामीण योजनेंतर्गत महाराष्ट्रासाठी तीन, कोटी वाढीव मनुष्य दिवसांच्या श्रमिक बजेटला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली.राज्याच्या श्रमिक बजेटमध्ये १३ कोटी मनुष्यदिवसांवरून १६ कोटी मनुष्यदिवसांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातमोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून,ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासाला गती

मिळेल. विशेषतः अकुशल कामगारांच्या उपजीविकेला भक्कम आधार मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**एसआयआर**

राज्यात निवडणूक याद्यांचा सुधारणा कार्यक्रम, एस.आय.आर. एप्रिल मध्ये लागू होणार असून, या माध्यमातून अचूक आणि पारदर्शक मतदार याद्या निर्माण होतील, अशी माहीती, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते आज माध्यमांशी बोलत होते. यासाठी लागणारा सर्व निधी राज्य सरकार देईल, असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्पीय अधिवेशन**

महाराष्ट्रात विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन, येत्या सोमवारी २३ तारखेपासून मुंबईत सुरु होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होणार असून त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर होईल. अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली असून, या अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अधिवेशन काळातच राज्यसभेच्या सात जागांसाठी निवडणूक होणार आहे.

**10वी परीक्षा**

महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळाच्या १०च्या परीक्षेला आज सुरुवात झाली. ९ विभागीय मंडळांमधून ऐकूण  १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. राज्यभरात एकूण ५ हजार १११ केंद्र असून ,कॉपीसह इतर गैरप्रकार रोखण्याकरता विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीस दलाची भरारी पथकं तैनात असून ड्रोनमार्फतही परीक्षा केंद्रावर लक्ष ठेवण्यात येत आहे. दरम्यान, मंडळाने संकेतस्थळावर जाहीर केलेलं अधिकृत वेळापत्रकच ग्राह्य धरावं ,असं आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केलं आहे. ही परीक्षा १८ मार्चपर्यंत चालेल.

**अंबाझरी तलाव**

नागपूर इथल्या अंबाझरी तलावातील जलपर्णी निर्मूलनाची मोहीम युद्धपातळीवर राबवण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले. महापौरांनी तलाव आणि एमआयडीसी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून ,जलपर्णी काढण्यासाठी पोकलेन, एन.डी.आर.एफ. आणि अग्निशमन दलाच्या सहकार्याने तातडीची कारवाई करण्यास सांगितल. तलावात नाल्यांमधून येणारे दूषित पाणी त्वरित बंद करण्याचे निर्देश देत, वाडी भागातील पाण्याच्या शुद्धीकरणासाठी स्वतंत्र केंद्र उभारण्यावर भर देण्यात आला. दूषित पाण्यातील पोटॅशियम आणि नायट्रेटच प्रमाण चिंताजनक असल्यान ,प्रभावी जलशुद्धीकरणाची गरज असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. जलपर्णी निर्मूलन आणि दूषित पाण्याचा प्रवाह रोखण्याचे काम तात्काळ सुरू करून अंमलबजावणी करण्याचे आदेश महापौरांनी दिले आहेत.

**आमसभा**

भाजपचा महापौर निवडून आल्यानंतर आज अमरावती महानगरपालिकेची पहिली आमसभा पार पडली. या सभेत आठ स्वीकृत नगरसेवकांची एकमताने निवड करण्यात आली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी समन्वय साधत, ही निवड प्रक्रिया सुरळीत पार पाडली.निवड झालेल्या स्वीकृत नगरसेवकांमध्ये, मिलिंद चिमटे (काँग्रेस), अनिल अग्रवाल (काँग्रेस), संजू तिरतकर (भाजप), प्रशांत देशपांडे (भाजप), दिनेश बुब (शिवसेना), भोजराज काळे (अजित पवार गट), अली भाई (AIMIM) आणि संजय हिंगासपुरे (युवा स्वाभिमान पार्टी) यांचा समावेश आहे.

**बाळशास्त्री जांभेकर जयंती**

मराठी भाषेतील आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केलं. नागपूर महानगरपालिकेतर्फे देखील मराठी पत्रकारितेचे जनक “दर्पणकार” आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आलं.

## अकोला सरस

बचत गटांच्या बळकटीकरणासाठी केंद्र आणि राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असून, बचत गटांनीही उत्पादनांमध्ये नाविन्य आणून अधिक ग्राहकाभिमुख होणे आवश्यक आहे, अस प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी केल. ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, उमेद-राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे ,अकोल्यातील लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे 'वऱ्हाडी जत्रा'-सरस, विभागीय प्रदर्शनाचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

## महिला क्रिकेट

महिला क्रिकेट मध्ये, भारतानं आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मजल मारली आहे. आज बँकॉक इथं झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ५ गडीराखून विजय मिळविला.

## मद्यबंदी

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील किडंगीपार इथं मद्याचे दुकान आणि दोन बार बंद करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी मद्यबंदी यज्ञ आणि धरणे आंदोलन केल. महिलांनी पुढाकार घेत २३ फेब्रुवारीपर्यंत दुकान बंद न झाल्यास २४ फेब्रुवारी रोजी आमगाव-गोंदिया मार्गावर रास्ता रोकोचा इशारा दिला आहे.

## कारवाई

भंडारा जिल्ह्यातील तुमसर वनविभागाने गस्ती दरम्यान काल, झंझेरिया बिटातील वाघसांध्या तलाव परिसरात, रानडुकरांच्या तस्करीप्रकरणी मोठी कारवाई केली. तुमसर वनविभागने १२ आरोपींना हत्यार, जाळे आणि गाडीसह ताब्यात घेतले. चौकशीत आरोपी जंगल आणि शेतातून रानडुक्कर पकडून नागपूर आणि छत्तीसगढ इथं विकत असल्याचं उघड झालं. वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत पुढील कारवाई सुरू आहे.

******